**ग्रीको रोमन वरिष्ठ गट प्राविण्य प्राप्त कुस्तीगीरांना तसेच प्राविण्य प्राप्त महिला कुस्तीगीरांना मानधन योजना लागू करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : क्रीडायो-२०१२/(प्र.क्र.६४/१२)/क्रीयुसे-२,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : २१ डिसेंबर, २०१२.**

**वाचा :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-पीएचई १०९३/प्र.क्र.१४८/क्रीयुसे-१, दिनांक १७ सप्टेंबर, १९९४**
**(२) शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो १०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै, १९९७**

**प्रस्तावना** :- राज्यातील कुस्ती कलेची परंपरा जोपासण्यासाठी तसेच कुस्तीगीरांच्या गुणांचा विकास होण्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मानधन देण्याची योजना राबविण्यात येत असून त्यानुसार माती व गादी विभागातील वजन गटनिहाय प्रथम सहा क्रमांकाच्या कुस्तीगीरांना तसेच सहा क्रमांकानंतरच्या सहभागी होणाऱ्या सर्व कुस्तीगीरांना उपरोक्त दिनांक ३१ जुलै, १९९७ च्या शासन निर्णयान्वये वजन गटनिहाय मानधन देण्यात येते. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने केलेल्या विनंतीनुसार ग्रीको रोमन वरिष्ठ गट प्राविण्य प्राप्त कुस्तीगीरांना तसेच महिला कुस्तीगीरांना मानधन योजना नव्याने लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**:शासन निर्णय :** ग्रीको रोमन वरिष्ठ गट प्राविण्य प्राप्त कुस्तीगीरांना वजन गटनिहाय सोबतच्या परिशिष्ट-अ येथे दर्शविल्याप्रमाणे तसेच प्राविण्य प्राप्त महिला कुस्तीगीरांना वजन गटनिहाय सोबतच्या परिशिष्ट-ब येथे दर्शविल्याप्रमाणे दरमहा मानधन देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्र.क्र.२९४/१२/व्यय-५, दिनांक ५/०५/२०१२) निर्गमित करण्यात येत आहे.

४. यावर होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ (०८)(०१) कुस्ती खेळाचा विकास यासाठी आर्थिक सहाय्य (२२०४ १६४ ९) ३४ शिष्यवृत्या/विद्यावेतने योजनेतर" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर तरतूदीमधून मागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक- २०१२१२२११५१७१९५२२१** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि.शां.परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(६)सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, (संचालनालयामार्फत)
(७) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (संचालनालयामार्फत)
(८) मा.मंत्री (क्रीडा)/मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
(९) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
(१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(११) अवर सचिव क्रीयुसे-१/क्रीयुसे-३
(१२) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

## परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय, क्र.क्रीडायो २०१२/प्र.क्र.(६४/२०१२),क्रीयुसे-२, दिनांक :- २१ डिसेंबर, २०१२ चे सहपत्र

ग्रीकोरोमन प्राविण्य प्राप्त कुस्तीगीरांना दरमहा द्यावयाच्या मानधन दराचा तपशील

| वजन गट | प्रथम (रूपये) | व्दितीय (रूपये) | तृतीय (रूपये) | चतुर्थ (रूपये) | पाचवा (रूपये) | सहावा (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५ | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ६० | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ६६ | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ७४ | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ८४ | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ९६ | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |
| ९६-१०० | २४०० | २००० | १५०० | १५०० | १२०० | १००० |

## परिशिष्ट 'ब'

### शासन निर्णय, क्र.क्रीडायो २०१२/प्र.क्र.(६४/२०१२),क्रीयुसे-२, दिनांक :- २१ डिसेंबर, २०१२ चे सहपत्र

### प्राविण्य प्राप्त महिला कुस्तीगीरांना दरमहा द्यावयाच्या मानधन दराचा तपशील

| वजन गट | प्रथम (रूपये) | व्दितीय (रूपये) | तृतीय (रूपये) | चतुर्थ (रूपये) |
|---|---|---|---|---|
| ४८ | २००० | १६०० | १२०० | १२०० |
| ५१ | २४०० | २००० | १५०० | १५०० |
| ५५ | २४०० | २००० | १५०० | १५०० |
| ५९ | २४०० | २००० | १५०० | १५०० |
| ६३ | २४०० | २००० | १५०० | १५०० |
| ६७ | २४०० | २००० | १५०० | १५०० |
| ७२ | २४०० | २००० | १५०० | १५०० |